महाराष्ट्र शासन
विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण), कोल्हापूर
राजाराम महाविद्यालय परिसर, विद्यानगर, कोल्हापूर ४१६ ००४

1/1337477/202

Phone No: 0231-2535400 Web Site: jdhekolhapur.in Email : jdhescholarship2@gmail.com


जा.क्रं. विसस/उशि/कोवि/शिष्यवृत्ती/2025/E- 2017627

प्रति,

परिपत्रक

दिनांक : २२.०७.२०२५.

१.कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर

२.कुलसचिव,
कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठ,सातारा.

३.प्राचार्य,
शासकीय,अशासकीय अनुदानित,विनाअनुदानित,कायम विनाअनुदानित कला,वाणिज्य,विज्ञान,विधी,व शिक्षणशास्त्र महाविद्यालये,कोल्हापूर विभाग,कोल्हापूर.

| आवक क्रमांक | ३९९ |
|---|---|
| दिनांक | २५/७/२०२५ |
| विभाग | शिष्यवृत्ती शाखा |
| श्री म. ता. शासकीय अध्यापक महावि., कोल्हापूर | प्राचार्य |

**विषय :** **राज्यातील अकृषी विद्यापीठे तसेच संलग्नित महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी 'स्वामी विवेकानंद युवा सुरक्षा योजना' लागू करणेबाबत.**

संदर्भ : १. शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०२१/प्र.क्र.१४/विशि-५,दि.१६.१०.२०२३
2. शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०२१/प्र.क्र.१४/विशि-५,दि. २८.११.२०२३
३.शिक्षण संचालनालय,उ.शि.पुणे यांचे पत्र E-३०४८७९ दि.१७.०७.२०२५

उपरोक्त विषयी, संदर्भाकीत शासन निर्णय व संचालनालयाच्या पत्रांच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, राज्यातील सर्व विद्यापीठांमध्ये अस्तित्वात असणाऱ्या सर्व प्रकारच्या विमा योजनांचा आढावा घेऊन योजनांची व लाभांची विविधता लक्षात घेता सर्व समावेशक एकछत्री नवीन विमा योजना लागू करण्याच्या उद्देशाने उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय दि. १६.१०.२०२३ व दि. २८.११.२०२३ अन्वये राज्यातील अकृषी विद्यापीठे तसेच संलग्नित महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांसाठी स्वामी विवेकानंद युवा सुरक्षा योजना' लागू करण्यात आली आहे.

स्वामी विवेकानंद युवा सुरक्षा योजनेबाबत Eligibility, Benefits (Accidental Coverage) तसेच Important Terms and Conditions संदर्भीय शासन निर्णय दि. १६.१०.२०२३ सोबतच्या प्रपत्र अ मध्ये दिलेल्या आहेत. संदर्भाकीत पत्रान्वये आपल्या कार्यकक्षेतील महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांना सदर योजनेबाबत अवगत करण्यासाठी तसेच पुरेशा प्रमाणात प्रसिध्दी करण्याबाबत निर्देश देण्यात आलेले आहेत.

तथापि सदर योजनेबाबत विद्यापीठांकडून पुरेशा प्रमाणात प्रसिध्दी केली जात नसल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामूळे विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयांतील विद्यार्थी सदर योजनेपासून अनभिज्ञ असून योजनेच्या लाभापासून वंचित आहेत.

त्यानुषंगाने विद्यापीठांना खालीलप्रमाणे पुनश्चः निर्देश देण्यात येत आहेत.

१. सदर योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी प्रसार व प्रचारार्थ विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयांच्या संकेतस्थळावर सदरहु योजनेचा तपशिल संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात यावा.

२. योजनेची माहिती देण्यासाठी विद्यापीठ स्तरावर शिबीराचे आयोजन करून विद्यार्थ्यांना या योजनेची माहिती विस्तृत स्वरूपात देण्यात यावी.

३. सदर योजनेसाठी svyuvasuraksha.org हे संकेतस्थळ विकसित करण्यात आलेले आहे. सदर संकेतस्थळावर योजनेबाबत मार्गदर्शनासाठी व शंका निरसनासाठी हेल्पलाईन नंबर व ई-मेल आयडी उपलब्ध करून दिलेला आहे.

क्रमांकावर संबंधित प्रतिनिधीशी संपर्क करावा. प्रस्तुत योजना महाविद्यालय व विद्यापीठ स्तरावर सर्व विद्यार्थ्यांना अवगत करून देऊन जास्तीत जास्त विद्यार्थी या योजनेचा लाभ घेतील, याबाबत दक्षता घेण्यात यावी.

उक्त निर्देशानुसार स्वामी विवेकानंद युवा सुरक्षा योजनेच्या अनुषंगाने विद्यापीठ व महाविद्यालयांनी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल प्रस्तुत कार्यालयास सादर करावा.

Signed by
Prakash Dhondu Bachhav
Date: 22-07-2025 17:41:27

[डॉ.प्रकाश बच्छाव]
विभागीय सहसंचालक (उ.शि.)
कोल्हापूर

**प्रत - १. मा.शिक्षण संचालक, उ.शि. पुणे. यांना माहितीस्व सादर.**